# स्त्रीवाद: स्त्री चळवळ

डॉ. स्मिता दि. जोशी
प्रिंसिपल अरूणराव कलोडे
महाविद्यालय, नागपूर

---

सारांश -

समाजामध्ये कमी जास्त प्रमाणात स्त्रियांचे शोषण सर्वत्र आढळते. हिंदू धर्माने स्त्रियांना अनेक अधिकारापासून वंचित केले आहे. शूद्राप्रमाणे हिंदू स्त्रीला देखील वेदाध्ययन करण्याचा किंवा यज्ञयागादी विधी करण्याचा हक्क नाही. कोणत्याही समाजातील स्त्रियांच्या दर्जाचे मूल्यांकन हे त्या समाजाच्या विशिष्ट चौकटीच्या संदर्भातच झाले पाहिजे. स्त्री जीवनावर महत्वपूर्ण असा प्रभाव शकणा-या महत्वाच्या संस्था म्हणजे कुटुंबसंस्था व नातेदारी संस्था व विवाह संस्था, वंशवारसा व्यवस्था आणि धार्मिक परंपरा या होत. स्त्रियांचे अधिकार आणि कर्तव्य याबाबतच्या समाजातील स्त्री पुरुषाच्या नव्या तांत्रिक घटकाकडून वैयक्तिक नैतिक आधार मिळतो. हिंदू धर्मामध्ये अशा अनेक पूर्वपार चालत आलेल्या अनिष्ट रूढी आणि परंपरा होत्या. ज्यांना तिलांजली देण्यासाठी अनेक समाजसुधारकांना अथक प्रयत्न करावे लागले.

प्रस्तावना

'स्त्री' हा शब्द उच्चारला की आपल्या डोळयासमोर येते ती शोषित, पिडीत, केवळ चूल आणि मूल हेच आपले विश्व समजणारी अशी, जिच्यावर अनंत काळापासून अत्याचार होत आलेले आहेत. पण अत्याचाराला विरोध करण्याची मानसिक तयारी नसलेली स्त्री, तिच्या या मानसिक असमर्थचे कारण तिला समाजाच्या आणि कायद्याच्या पाठिंबा नाही. 'स्व:च्या शोधासाठी चाललेल्या स्त्रीचा आजचा लढा समजून घेतांना थोडे इतिहासात जावून वेध घ्यावा लागले. त्या काळात हा लढा स्त्री मुक्तिच्या नावाने ओळखल्या गेला नसेल, तरीही आजच्या स्त्री मुक्ती चळवळीची मुळे त्यात सापडतील.

जागतिक लोकशाहीवादी स्त्री संघटणेने जागतिक स्त्रियांच्या पारिस्थिकडे लक्ष वेधले यासाठी 1975 हे वर्ष महिला वर्ष म्हणून पाळावे व त्यांच्या हक्कांची सनद तयारी करावी. अशी विनंती संयुक्त राष्ट्र संघाला (युनो) एका ठरावाद्वारे केली.

युनोने हि विनंती मान्य केली व 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरविले. स्त्रियांच्या सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून येण्यासाठी एक वर्षांच्या काळ पुरेसा नाही म्हणून 1985 पर्यंत आंतरराष्ट्रीय महिला दशक मानने अशी सूचना परिषदेने केली. समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून स्त्रियांच्या अनेक संघटना या दशकात वाढल्या आहेत. स्त्री पुरूष समानतेसाठी करावा लागणारा संघर्ष हा लवकर संपणारा नाही. स्त्री पुरूषांमध्ये सहकार्याची भावना समाविष्ट होणे आवश्यक आहे.

सामाजिक चळवळ ही जुन आणि नवमूल्य आणि संरचनेच्या संगमाच्या प्रयोगासाठी तरतूद करते. पुरूषप्रधान संस्कृती व त्या व्यवस्थेतील सामाजिक जाणिवा अस्तित्वातून निर्माण झालेली स्त्री पुरूषांची मानसिकता याच्याशी या संघर्षाचे स्वरूप निगडित आहे. नियतिवादा विरूद्ध हा संघर्ष आहे. स्त्रियांची भूमिका आणि दर्जा गौण ठरविणा-या विचारसारणी विरूद्धचा हा संघर्ष आहे. स्त्रियांची सामाजिक आणि मानसिक पिंज-याच्या गुलामी संपवून त्यांना अंधश्रद्धेच्या जगातून तसेच पुरातन काळाच्या सोनेरी पिंजरयायांच्या जाळयातून बाहेर काढणे हा हेतू या चळवळीच्या मागे आहे स्त्रियांना समाजात योग्य स्थान मिळवून देण्यासाठी अनेक चळवळी समोर आल्या आणि स्त्रियांना मग त्या शहरी असो की ग्रामीण न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. भारतातील पुरूषांचे प्राबल्य हे पाश्चात्य समाजातील पुरूषांच्या प्राबल्यापेक्षा वेगळे आहे. त्यामुळे भारतामधील स्त्रियांच्या मागण्या या पाश्चात्य स्त्रियांच्या मागण्यापेक्षा वेगळया आहेत.

या देशातील समाजसुधारकांनी स्त्रियांची अवस्था सुधारण्यासाठी चळवळी केल्या. समाज सुधारक राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, महादेव गोविंद रानडे यांनी आपला आवाज धार्मिक आणि सामाजिक परंपरा यांच्याविरूद्ध उठविला. परिणामतः इंग्रज सरकारने सुद्धा प्रभावित होवून काही कायदे तयार केले. जसे सती प्रथावर बंदी, विधवा विवाहाला मान्यता, बाल विवाह पद्धती बंदी, इत्यादी त्यांनी स्त्री शिक्षणासाठी सुद्धा प्रयत्न केले. महात्मा गांधीनी स्त्रीला स्वयंपाक घरातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. राजकीय हक्क, समान नागरिकत्व आणि विधी मंडळात प्रतिनिधीत्व हया वरील मागण्या स्त्री नेत्यांनी स्त्रियांसाठी मागितल्या. 1920 साली भारतीय महिला संघटना आणि अखिल भारतीय महिला परिषद या स्त्री संघटना

स्त्रियांमध्ये स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अस्तित्वात आल्या. स्त्री संघटनांनी स्त्री दर्जावर घाला घालणा-या प्रश्नांवर आवाज उठविला, बलात्कार, सती प्रथा पद्धती, स्त्री अत्याचार, सती पद्धती, दारू, हुंडा पद्धती, स्त्रियांचा कौटुबिक छळ, काम करणा-या स्त्रियांचे प्रश्न, अश्लील पोस्टर, देवदासी, इत्यादी. समाज सुधारक चळवळीचे नेते ज्यांनी मागील शतकात स्त्री प्रश्नांवर प्रकाश टाकला ते जास्तीत जास्त उच्च समाजाशी संबंधीत होते.

**उद्दिष्ट -**

स्त्रियांसाठी अनेक कायदे होवूनही स्त्रीवर वेगवेगळया प्रकारे अत्याचार समाजात होत आहे. स्त्रीयांसाठी पूर्वीपासून कार्ये स्त्री संघटना करतच आहे. त्यामध्ये केवळ शारीरिक शोषण नसून एकंदर सामाजिक शोषण हा उद्देश यांच्या स्थापनेचा होता त्यादृष्टीने काही नागपूरातील काही जुन्या संस्थांचा आढावा घेवून त्याद्वारे स्त्री चळवळीला त्या कितपत उपयोगी येत आहे. हे पाहण्याच्या उद्देशाने हा अभ्यास आहे.

**स्त्री वादाचा सिद्धांत**

स्त्री वाद म्हणजे स्त्री पुरूष हा भेद नाकारून समानतेकडे पाऊल टाकणारा विचार प्रवाह. स्त्री वाद ही संकल्पना जरी पाश्चात्य आधुनिकतेत उदयास आली असली असे जरी वरवर वाटत असले तरी, त्याची जाणीव त्या आधिच्या काळातपण दिसून येते. स्त्रीवाद समानतेच्या तत्वाचा पुरस्कार करते. ही चळवळ पुरूष विरोधी नसून स्त्री चा एक माणूस म्हणून विचार करावा या विचारांची आहे. स्त्रीवादाचे प्रमुख तीन सिद्धांत आहे. 1) उदारवादी सिद्धांत 2) मार्क्सवादी सिद्धांत आणि 3) उग्रवादी सिद्धांत.

उदारवादी सिद्धांत -

उदारवादी सिद्धांत हे स्त्री ला स्वतःचा विकास करता यावा तिच्यातील कौशल्य वाढीस लागावे या विचारांवर विश्वास ठेवत असे. स्त्री ही स्त्री म्हणून जन्मत नाही तर ती घडविली जाते. हे फ्रेच स्त्रीवादी लेखिका सिमॉन दि ब्रोव्हारचे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणिवेचे महत्वचे प्रमेय आहे. अगदी प्रारंभीच्या अठराव्या शतकापासून उदारमतवादी स्त्रीवाद उदयास आला. समाजामध्ये ज्या रूढी परंपरा आहे या स्त्रीच्या दुय्यमत्वाचे मूळ आहे. स्त्रीची शारीरिक रचना आणि बुद्धीची कमतरता म्हणून ही दुबळी आहे, असे समजात रूढ आहे. असा उदारमतवादी स्त्रीवादाचा विचार प्रवाह

दिसतो. उदारमतवादी स्त्रीवादावर बरीच टिका पण झाली. उदारमतवादी विचारप्रवाह सुरवातीच्या काळात पुरूष विरोधी होता. वर्ग, लिंग भेद भाव याला अप्रत्यक्ष पाठींबा देणारा होता.

जहाल स्त्री वाद –

जहाल स्त्रीवाद हा उदारमतदवादी विचारप्रवाहाला प्रतिउत्तर आहे. जहाल स्त्रीवाद हा समाजातील पितृसत्ताक सामाजीक सैरंचनेच्या विरोधात आहे. स्त्रियांचे शोषण, वर्चस्व, नियंत्रण आणि स्पर्धा यामुळे होते. याला पितृसत्ताक सामाजिक सैरंचना कारणीभूत आहे. त्यामुळे राजकीय सांस्कृतीक आणि सामाजिक अशा सर्वच पातळयांवर संस्थांमध्ये बदल होणे आवश्यक आहे.

माक्सर्वादी स्त्रीवाद –

जहाल स्त्रीवाद आणि उदारमतवादी स्त्रीवाद या दोन्ही विचारप्रवाहापासून वेगळा असा मार्क्सवादी स्त्रीवाद आहे. जो स्त्रियांच्या मुक्तीसाठी वर्गमुक्त समाजाची आवश्यकता प्रतिपादीक करतो. लिंग भेदावर आधारित जी श्रम विभागणी आहे त्यामुळे पुरूष वर्गाला संपूर्ण जग मोकळे आहे कामकरण्यासाठी. पण महिलाला मात्र घरकामामध्ये अडकून दिल्या जातो. जेव्हा स्त्रिया या कामासाठी घराबाहेर पडतात तेव्हा त्यांची वर्ग, लिंगभाव, याला अनुसरून बहुतेक कामे दिली जातात. आणि पुरूषांच्या तुलनेत कमी उत्पन्न दिले जाते. स्त्रियांचे शोषण थांबविण्यासाठी पितृसत्ताक भांडवलशाली या विरोधात लढा दयावा लागेल.

गृहितकृत्ये –

प्रस्तुत अभ्यासासाठी काही गृहीतकृत्ये स्विकारली आहे. ऐतिहासिक अभ्यासकाराने दाखवून दिल्या प्रमाणे स्त्री चळवळीवर उच्च वर्गीय नेतृत्वाचा जो पगडा आहे. त्यामुळे स्त्री संघटनाचे कार्य सिमित झाले आहे. सामाजिक निमंत्रणाची साधने सिमित झाल्यामुळे स्त्री अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. स्त्री शक्तीचा संघटित आविश्कार जसा वाढतो त्या प्रमाणात स्त्री अत्याचाराला घटना कमी होतात. हे गृहीतकृत्य तपासण्यासाठी स्त्री अत्याचाराने पिडीत व नोंदविलेल्या घटना तपासण्यास आल्या. अभ्यासासाठी असंरचित अशा मुलाखत पद्धतींचा वापर करण्यात आला. याचा अभ्यास करण्यासाठी अन्वेषणात्मक आराखडा आणि वर्णनात्मक आराखडा या दोन्हीचा

समन्वय साधला आहे. या अभ्यासासाठी नागपूरातील काही संघटनाचा अभ्यास करण्यात आला.

समाजिक क्षेत्रातून स्त्रियांसाठी जे कार्य झाले त्यात मराठी स्त्रियांनी स्त्रियांकरिता स्थापन केलेली एक नामवंत संस्था म्हणजे नागपूरची मातृसेवा संघ 1921 मध्ये स्थापन झाली. यांच्या शाखा विदर्भ तसेच मध्य प्रदेश मध्ये वेगवेगळया नावाने आहे. राष्ट्रीय स्वयंसेविका समिती हीची स्थापना 1936 साली झाली. लक्ष्मीबाई केळकर यांच्या विचारांवर लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीचा ठसा उमटला होता. महात्मा गांधीनी स्त्रियांनी पुरुषाप्रमाणे राजकारणात समाजकरणात भाग घ्यावा असे आव्हान केले. या संघटनेचा प्रारंभ हाच मुळी अध्यात्मापेक्षा राष्ट्रवादाने झाला.

1975 हे वर्ष जसे आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहिर झाले. तसेच स्त्री लेखिका आणि त्यांच्या लिखाणाला उधाण आले आणि त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नाचे , त्यांच्या समस्यांचा वर्षाव समाजापुढे केला. महिला संस्था या वेगवेगळया उदिष्टे समोर ठेवून कार्य करतात असे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक यांच्या उद्दिष्टावरून त्यांचे वर्गीकरण करण्यात आले.

पुरूषाबाबत स्त्रीयांचा दृष्टीकोण -

उदारमतवादी व्यक्तींच्या प्रयत्नांनी स्त्रियांच्या चळवळीने कायदयात परिवर्तन् झाले. पण हा बदल वरवरच आहे. स्त्री जीवनाचा गाभा अजून जुनाच आहे. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोण अजूनही बदलला नाही. 1975 हे आंतरराष्ट्रीय स्त्री दशक वर्ष मिळवत्या स्त्रियांवर पडणा-या जबाबदा-या घर सांभाळणारी स्त्री आई व मिळवती स्त्री यातील भूमिकांचा डोईजड भार कमी केल्यावाचून स्त्री पुरूषामध्ये समानता येणार नाही. अशा सामाजिक स्त्री विरोधी वातावरणामुळे आज स्त्रीचा पुरूषाबाबत आणि समाजाने घालून दिलेल्या बेडयांमुळे त्यांचा दृश्टीकोण बदलत चालला आहे. आज स्त्री पुरूषांकडे देव दृष्टीने न पाहता जीवनाचा समर्थदार या दृष्टीने पाहाते.

निष्कर्ष -

1975 हे आंतरराष्ट्रीय महिला दशक जाहीर करताच स्त्री चळवळीला एक वेगळेच वळण मिळाले. ब्रिटिश काळात स्त्री चळवळ आणि राष्ट्रीय चळवळ या वेगळया नव्हत्या. त्या काळात काही समाजसुधारकांनी समाजाचा घटक असलेल्या स्त्रियांच्या सामाजिक अन्यायाची बंधने दूर करण्यात सुरवात केली आणि स्त्री

चळवळीची मुर्हूतमेढ रोवली. 1975 च्या आधी या चळवळीचे कार्य स्त्रीला समाजस्तरावर आणण्याचे आणि स्त्रीला जर आर्थिक स्वातंत्र्य मिळाले नाही तर समान दर्जा पण मिळणार नाही म्हणून तिची आर्थिक उन्नती भरण्यासाठी तिला शिक्षण देणे आवश्यक आहे, हे होते. पण 1975 हे आंतरराष्ट्रीय महिला दशक जाहिर होताच स्त्री समस्येला वेगळे वळण मिळाले. चळवळ याचा सामान्यतः अर्थ डोळयासमोरील ध्येयापर्यंत पोहचवे आणि त्यासाठी संघटितरित्या प्रयत्न करणे होत असा संघटित रित्या प्रश्न बराच तंत्राचा वापर करून केला जातो. अशी तंत्रे मोर्चे, सत्याग्रह, निदर्शन, घेराव हे होय. याचा वापर शासनावर दबाव आणण्यासाठी केलाजातो. पण या तंत्राचा वापर हा प्रासंगिक दिसून येतो. नागपूरात स्त्री चळवळ हि अजूनही प्राथमिक स्तरावरच दिसून येते. त्याचे कार्य हे प्रासंगिक दिसून येते. त्यामध्ये सातत्य दिसत नाही. स्त्री चळवळ फोफावली नाही ती शहरापुरती मर्यादित राहिली. ग्रामीण भागातील स्त्रियांना ती अजून आपल्याकडे आकर्षित करू शकली नाही. काळानुसार स्त्री संघटनांच्या उद्दिष्टांमध्ये फरक दिसून येतो. स्वातंत्र्यापूर्वीच्या स्त्री संघटनांचे उद्दिष्टये स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रीय चळवळीला पूरक होते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर त्याचा उद्देश स्त्रियांचा आर्थिक आणि शैक्षणिक स्तर उंचावण्याला होता. तिसरा कालखंड हा स्त्री मुकतीच्या वैचारिक प्रवाहाखाली आलेला होता. यामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दषक घोषित झाले होते. त्यामुळे स्त्रीवादी भूमिका असलेल्या संघटना उदयास आल्या. स्त्री संघटनांनी ज्या ज्या उद्दिष्टांना प्राधान्य दिले त्यावरून सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक, आरोग्य विषयक संघटना या प्रकारात मोडतात. प्रत्येक संस्थेचे ध्येय स्त्रीचा सामाजीक विकास व्हावा हेच असले तरी त्यांनी मार्ग वेगवेगळे स्विकारलेले दिसतात.

आजच्या काळात राजकारण आणि समाजकारण हे हातात हात घालून चालतात सामाजिक क्षेत्रात काम करणा-या व्यक्ती आणि राजकीय क्षेत्रात काम करणा-या व्यक्तीं यांचा सतत संबंध येतो. संघटनेला लागणारा आर्थिक हातभार यातूनच पुरविला जातो. निवडणुकीच्या काळातही या संघटनांद्वारे राजकीय पक्षांना मतदार प्राप्त होतात. पण राजकीय पक्षांशी संबंध आहे हे सगळयाच संघटना मान्य करित नाही. राजकीय क्षेत्राशी संबंधित असणा-या सामाजिक संघटनाकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोण

चांगला दिसूत नाही. राजकीय क्षेत्रात वाढलेले गुन्हे, बिघडलेले वातावरण यामुळे सर्वसामान्य स्त्री अशा संघटनाचा आधार घेताना दिसत नाही.

आज समाजामध्ये स्त्रियांबाबत इतके गुन्हे अत्याचार घडतात. स्त्रियांसाठी इतके कायदे करण्यात आले तरी गुन्हयांचे प्रमाण वाढतच आहे. समाज जसजसा आधुनिकतेकडे जात आहे तसतशा समस्या वाढत आहे. आधुनिकीकरण म्हणजे पाश्चिमीकरण्यांचे अंधाणुकरण करने हे समीकरण झाले आहे. तरूण पिढी त्याला बळी पडतांना दिसते. आजस्थिती दृकश्राव्य साधने आहेत त्यामध्ये स्त्रीला आधुनिक दाखवतांना भडक चित्रे दाखविली जातात. स्त्री शक्तीचा संघटित आविष्कार जसजसा वाढतो त्या प्रमाणात स्त्री अत्याचाराच्या घटना कमी होतात हे गृहीतकृत्य तपासण्याचा प्रयत्न केला आहे. दिवसेंदिवस स्त्री अत्याचाराचा आलेख वाढलेला दिसतो. त्यामुळे जरी स्त्री संघटना 1975 पासून वाढीस लागल्या तरी स्त्री अत्याचाराचे प्रमाण कमी झाले नाही. त्यामुळे स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी स्त्री संघटनांची आवश्यकता नाही असा ग्रह होने शक्य आहे. पण या स्त्री समस्या समाजासमोर येण्यासाठी स्त्री संघटना याशिवाय दुसरा तरणोपाय नाही, असेच म्हणावे लागेल.

## संदर्भ

1. Desai Neeta and Patel : Indian Women : Change and Challenge in the Intenational decade 1975-85 Popular Bombay 1990
2. Sashi Deshpande, Women's Liberation Movement and its solveance to India, Vol. No. 2, Aug. 1975.
3. रमा शर्मा , महिला सशक्तीकरण
4. एम.के.मिश्रा, अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 2010
5. डॉ. राजकुमार, नारी के बदल ते समय, अर्जून पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली, 2005